## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७९५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/१२/२०१६

**१) आरोपी न्यायालयाची परवानगी न घेता शहरात फिरतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०२/१२/२०१६ रोजी १०.३० वा. दर. यातील आरोपी यास मा. कोर्ट विद्यमान श्रीमती शिल्पा सोनाले उपवीभागिय दंडाधीकारी तुमसर यांचे दि. १४/१२/२०१६ चे आदेशान्वये गोंदीया ,भंडारा, नागपुर जिल्हयातुन हददपार केले असतांनी सुध्दा आरोपी हा शासनाची अथवा संबधीत न्यायालयाची परवानगी न घेता तुमसर शहरात प्रवेश करून फिरतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी श्रीवास पोस्टे तुमसर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १४२ मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पोहवा. श्रीवास पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**२)प्राणी निदर्यतेने वाहनात कोंबुन वाहतुक करतांना मिळुन आल्याने व वाहन सोडुन पळुन गेल्याने गुन्हा नोंद. :–**

दि. ०२/१२/२०१६ चे ०४.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहणामध्ये कोणतेही वैदयकीय प्रमाणपत्र न बाळगता ५ गाई व १ बैल एकुण कि. २०,०००/–रु. चे प्राण्यांना हयगयीने, गैरवर्तवणुकीने निदर्यतेने वाहनात कोंबुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने व आरोपीने आपले ताब्यातील वाहन सोडुन पळुन गेल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. उपरीकर पो. स्टे. लाखनी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २८९ भादंवि. सहकलम ११(१)(ड) प्राणी निदर्यतेने वागविण्याचा कायदा सहकलम ९ महा. प्रा. सं. कायदा सहकलम ८३ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक ०१/१२/२०१६ रोजी १७.००ते १७.३० वा. दर. यातील फिर्यादी सतिश शामराव देशभ्रतार वय ४० वर्ष, रा. गांधी वार्ड वरठी याची हिरो होंडा मोटार सायकल क्र. एमएच ३६ जी ५६५७ कि. १०,०००/–रु. ची तलावाचे पाठीवर ठेवुन बाजार करण्यास गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. हलमारे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**४) पंतजली सामानाचे वितरण करीत असतांना पैश्याची व सामनाची अफरातफर गेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २१/११/२०१६ रोजी १६.०० वा. दर. यातील फिर्यादी रामदास फत्तुजी राना वय ५१ वर्ष, रा. श्रीराम नगर तुमसर हा पंतजली उत्पादक वस्तु व्यवसाय करीत असुन यातील आरोपी हा फिर्यादीचे महीन्द्रा जिप क्र. एमएच ३६ एफ ३३१० वर चालक म्हणुन आहे. फिर्यादीचे सामानाचे वितरण करीत असता आरोपीने फिर्यादीचे दिवानजिस तु येथे थांब मी येतो असे सांगुन दिवानजिस गाडी खाली उतरवुन वाहनात असलेले नगदी ३९,०००/–रु. व पंतजलीचे उत्पादक वस्तु किं ७२२८ /–रु. चा माल असा एकुण ४६,२२८/–रु. आपले सोबत घेवुन अफरातफर केली व फिर्यादीस पैसे देण्यास टाळाटाळ करीत असल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४०८ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. हलमारे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक ०२/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ९६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०५, तिन सिटर वाहनांवरती १० केसेस व ईतर वाहनांवरती ८१ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.